**वाचले:-**

१) सहशहर अभियंता, विद्युत मुख्य कार्यालय यांचे पत्र क्रमांक क्र.अ.वि.दू.स./आस्था/कावि/509/2024 दि. 28/06/2024.

२) महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम 1982 मधील नियम 10(1).

३) अधिकार प्रदान आदेश क्रमांक प्रशा/1/कावि/1175/2013.दिनांक 29/08/2013

---

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी – 411018
सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक: साप्रवि/3अ/कावि/69/2024
दिनांक : 05/07/2024

विषय :- नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तिबाबत.......
श्री.भोसले राष्ट्रपाल ज्ञानेश्वर, पदनाम -वायरलेस ऑपरेटर,( संगणक क्रमांक 5058 )

आदेश,

श्री. भोसले राष्ट्रपाल ज्ञानेश्वर हे पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवरील वायरलेस ऑपरेटर या गट क मधील पदावर अणुविद्युत व दूरसंचार विभाग येथे काम करीत आहेत. दिनांक 27/03/1989 रोजी ते म.न.पा.मध्ये वायरलेस ऑपरेटर पदावर रूजू झाले आहेत. त्यांच्या सेवानोंद पुस्तकामधील नोंदी नुसार त्यांची जन्मतारीख 15/08/1966 अशी असून दिनांक 14/08/2024 रोजी त्यांच्या वयास 58 वर्ष पूर्ण होत आहेत.

.महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियम 1982 मधील नियम 10(1) नुसार गट क मधील कर्मचा-यांना वयाची 58 वर्ष पूर्ण होतील त्या महिन्याच्या शेवटच्या तारखेस नियत वयोमानानुसार मध्यानोत्तर सेवानिवृत्त करणे आवश्यक आहे.

सहशहर अभियंता, अणुविद्युत व दूरसंचार विभाग,यांनी दिनांक 28/06/2024 रोजीच्या पत्रान्वये, श्री.भोसले राष्ट्रपाल ज्ञानेश्वर, वायरलेस ऑपरेटर यांचेकडून म.न.पा.चे घरबांधणी कर्ज, घर दुरुस्ती कर्ज, संगणक कर्ज, वाहन कर्ज, कामगार कल्याण निधी कर्ज, वैद्यकीय अग्रिम कर्ज येणे बाकी नाही. तसेच सद्यस्थितीत त्यांची खातेनिहाय चौकशी चालू अथवा प्रस्तावित नाही. असा अहवाल सादर केला असून,त्यांना दिनांक 31/08/2024 रोजी नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस शिफारस केली आहे.

सबब, सहशहर अभियंता, अणुविद्युत व दूरसंचार विभाग, यांचेकडील दिनांक 28/06/2024 रोजीचा अहवाल, महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ति वेतन) नियमातील उक्त तरतूद विचारात घेऊन उपरोक्त वाचले क्रमांक 3 वरील आदेशान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार श्री. भोसले राष्ट्रपाल ज्ञानेश्वर, वायरलेस ऑपरेटर यांना दिनांक 31/08/2024 रोजी मध्यान्होत्तर महापालिका सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त करणेस या आदेशान्वये मान्यता देण्यात येत आहे.

श्री. भोसले राष्ट्रपाल ज्ञानेश्वर, वायरलेस ऑपरेटर यांना निवृत्तिवेतन,सेवा-उपदान इ.रकमा अदा करण्यासाठी आवश्यक त्या कागदपत्रांची पूर्तता सबंधित विभागाने करून प्रकरण पुढील कार्यवाहीसाठी सत्वर लेखा विभागाकडे पाठवावे.लेखा विभागाने श्री.भोसले राष्ट्रपाल ज्ञानेश्वर, वायरलेस ऑपरेटर यांचेकडून महापालिकेस घरबांधणी कर्ज,वाहन कर्ज, संगणक कर्ज, वैद्यकीय अग्रीम,इत्यादी पैकी अथवा अन्य काही रक्कम येणे बाकी आहे काय ? या बाबत खातरजमा करावी व त्यांचे कडून काही येणे बाकी रक्कम असल्यास , ती त्यांना देय असलेल्या रकमेतून वसूल करून अंतिमत: देय रक्कम त्यांचे सेवानिवृत्तिचे दिनांकास अदा करावी.

प्रस्तुत आदेशाची नोंद श्री.भोसले राष्ट्रपाल ज्ञानेश्वर पदनाम -वायरलेस ऑपरेटर यांचे सेवानोंद पुस्तकात घेण्यात यावी.

उप आयुक्त
सामान्य प्रशासन विभाग
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – 411018

प्रति,
श्री./श्रीमती भोसले राष्ट्रपाल ज्ञानेश्वर,
पदनाम-वायरलेस ऑपरेटर
अणुविद्युत व दूरसंचार विभाग ,

प्रत :- 1) लेखा विभाग 2) मुख्य लेखापरिक्षण 3) वैयक्तिक नोंद कक्ष 4) गोपनिय अहवाल कक्ष 5) सेवाज्येष्ठता कक्ष 6) मागासवर्ग कक्ष 7) संगणक कक्ष - सामान्य प्रशासन 8) विद्युत विभाग 9) दूरसंचार विभाग 10) कामगार कल्याण विभाग 11) पि. चि. म. न. पा. कर्मचारी महासंघ 12) पिं. चि. म. न. पा. सह. पतसंस्था 13) विद्युत मुख्य कार्या. विभाग
2/- सोबत श्री./श्रीमती भोसले राष्ट्रपाल ज्ञानेश्वर पदनाम -वायरलेस ऑपरेटर यांचे सेवानोंद पुस्तक आवश्यक त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.